# FOGSI

Federation of Obstetric & Gynecological Societies of India

## Press Conference to Announce

# High Dependency Units and Specialized Obstetric ICU for Critical Care in Obstetrics

**On 19-21st July 2013, Friday - Sunday**

**At Ahmed Nagar**

**Strategic Consultancy & Integrated Communications Firm**

- **Ideation to implementation for desired output**
- **Knowledge consultancy / Media advocacy**
- **Public Affairs / Branding / Marcom - PR**

`

# Print media coverage

| S.No. | Name of the Publications |
|---|---|
| 1 | Dainik Nagar Times –(with photo) |
| 2 | Gnandhara |
| 3 | Dainik Kranti Sinh –(with photo) |
| 4 | Lok Awaaj |
| 5 | Nav Marata –(with photo) |
| 6 | Sarv Math –(with photo) |

| Name of Media: | Dainik Nagar Times | Language: | Marathi |
| --- | --- | --- | --- |
| Date : | 13.08.13 | Page: | 06 |

## गरोदर मातांच्या सुरक्षेसाठी स्त्री रोगतज्ज्ञांचा पुढाकार

# सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग सुरू होणार-डॉ. हेमा दिवेकर

नगर, दि.१२ – गरोदरपणा, अतिरक्तदाब, विषबाधा, रक्तस्त्राव, पू होणे, मधुमेह व काविळीसारख्या आजाराने मातांचे व बाळांचे होणारे मृत्यू रोखण्यासाठी स्त्री रोगतज्ज्ञ व प्रसुतीरोग तज्ज्ञांची शिखर संघटना असलेल्या फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अॅण्ड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (एफओजीएसआय) या संघटनेने पुढाकार घेतला आहे. देशभरातील शासकीय व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग सुरू होणार आहेत, अशी माहिती संघटनेच्या अध्यक्षा डॉ. हेमा दिवेकर यांनी दिली.



शहरी भागात वैद्यकीय सेवा दर्जेदार मिळतात, त्यामुळे गरोदरपणात माता व बाळाच्या मृत्यूचे प्रमाण कमी आहे, पण ग्रामीण भागात गरोदरपणी महिलांनी स्वत:ची विशेष काळजी घेतली नाही वा कुटुंबियांनीही त्याकडे दुर्लक्ष केले तर माता व बाळाच्या मृत्युच्या घटना घडण्याचे प्रमाण जास्त आहे, ही स्थिती दूर व्हावी तसेच माता व बाळांचे जीवन सुरक्षित असावे यासाठी हाय डिपेंडन्सी युनिट (एचडीयु) व स्पेशलाईज्ड डेडीकेट ऑब्स्टेट्रीक आयसीयू विभाग सरकारी व सार्वजनिक रुग्णालयांसह खासगी रुग्णालयांमध्येही सुरू करण्याचे नियोजन आहे. याअंतर्गत रुग्णालयाचा सामान्य रुग्णविभाग (जनरल वॉर्ड) व अतिदक्षता विभाग (आयसीयू) या दरम्यान विशेष कक्ष सुरू करुन जोखमीचे गरोदरपण असलेल्या महिलांची विशेष काळजी या कक्षाद्वारे घेतली जाणार आहे. या महिलांच्या प्रकृतीची इन्व्हेसिव्ह मॉनिटरिंग सुविधेद्वारे बारकाईने देखरेख करुन त्यांच्यावर आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत.

एचडीयु विभागाची रचना अतिदक्षता विभाग वा सामान्य रुग्ण विभागापेक्षा वेगळी असणार आहे. यात व्हेंटिलेटर, सोनोग्राफी, सीटीजी मशीन, सीव्हीपी मॉनिटर असलेला कार्डिअॅक मॉनिटर, इनक्युबेशन किट, इमर्जन्सी कीट, वॉल माऊंटेड ऑक्सिजन यंत्रणा व अन्य सुविधा असणार आहेत. ग्रामीण भागातील गरोदर महिलांवर बहुतांश वैद्यकीय उपचार सरकारी रुग्णालयांतूनच होत असल्याने अशा रुग्णालयांमध्ये असे अत्याधुनिक दक्षता कक्ष सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अॅण्ड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (एफओजीएसआय) ही देशभरातील प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोगतज्ज्ञांची संघटना असून या संघटनेच्या अध्यक्षा डॉ. हेमा दिवेकर, उपाध्यक्ष डॉ. अल्पेश गांधी यांनी एचडीयू या संकल्पनेचा प्रकल्प अहवाल तयार केला असून महाराष्ट्रासह गुजरात, तामीळनाडू, कर्नाटक, मध्यप्रदेश व आसाममधील आघाडीच्या १२ वैद्यकीय विद्यापीठांना पाठवला आहे. त्यांच्याकडूनही त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. लवकर यासंदर्भात पुण्यात प्रसुतीरोग तज्ज्ञांची विशेष कार्यशाळा घेण्यात येणार आहे. गरोदर महिलांसाठीच्या या वैद्यकीय उपचारांची माहिती यात दिली जाणार आहे. यासाठीचा विशेष अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी मोबा. ९८४५८१९१९१ अथवा ९९००१५४४४८ वर संपर्क साधावा. www.fogsi.org या संकेतस्थळावरही याची माहिती उपलब्ध आहे, असे डॉ. हेमा दिवेकर यांनी सांगितले.

`

| Name of Media: | Gnandhara | Language: | Marathi |
|---|---|---|---|
| Date : | 05.08.13 | Page: | 04 |

# गरोदर मातांच्या सुरक्षेसाठी स्त्रीरोग तज्ज्ञांचा पुढाकार

## सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग - माता मृत्युदर कमी होणार

अहमदनगर : गरोदरपणा अतिरक्तदाब, विषबाधा, रक्तस्त्राव, पू होणे, मधुमेह व काविळीसारख्या आजाराने मातांचे व बाळांचे होणारे मृत्यु रोखण्यासाठी स्त्री रोग तज्ज्ञ व प्रसुतीरोग तज्ज्ञांची शिखर संघटना असलेल्या फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (एफओजीएसआय) या संघटनेने पुढाकार घेतला आहे. देशभरातील शासकीय व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग सुरू होणार आहेत.

शहरी भागात वैद्यकीय सेवा दर्जेदार मिळतात, त्यामुळे गरोदरपणात माता व बाळाच्या मृत्यूचे प्रमाण कमी आहे, पण ग्रामीण भागात महिलांनी गरोदरपणात स्वतःची विशेष काळजी घेतली नाही वा कुटुंबियांनीही त्याकडे दुर्लक्ष केले तर माता व बाळाच्या मृत्यूच्या घटना घडण्याचे प्रमाण जास्त असते. ही स्थिती दूर व्हावी तसेच माता व बाळांचे जीवन सुरक्षित असावे यासाठी हाय डिपेंडन्सी युनिट (एचडीयु) व स्पेशलाईज्ड डेडीकेटेड ऑब्स्टेट्रीक आयसीयू विभाग सरकारी व सार्वजनिक रुग्णालयांसह खासगी रुग्णालयांमध्येही सुरू करण्याचे नियोजन आहे. याअंतर्गत रुग्णालयाचा सामान्य रुग्णविभाग (जनरल वॉर्ड) व अतिदक्षता विभाग (आयसीयू) यादरम्यान विशेष कक्ष सुरू करून जोखमीचे गरोदरपण असलेल्या महिलांची विशेष काळजी या कक्षाद्वारे घेतली जाणार आहे. या महिलांच्या प्रकृतीची इन्व्हेसिव्ह मॉनिटरिंग सुविधेद्वारे बारकाईने देखरेख करून त्यांच्यावर आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत.

एचडीयु विभागाची रचना अतिदक्षता विभाग वा सामान्य रुग्ण विभागापेक्षा वेगळी असणार आहे. यात व्हेंटिलेटर, सोनोग्राफी, सीटीजी मशीन, सीव्हीपी मॉनिटर असलेला कार्डिअॅक मॉनिटर, इनक्युबेशन किट, इमर्जन्सी कीट, वॉल माऊंटेड ऑक्सिजन यंत्रणा व अन्य सुविधा असणार आहेत. ग्रामीण भागातील गरोदर महिलांवर बहुतांश वैद्यकीय उपचार सरकारी रुग्णालयांतूनच होत असल्याने अशा रुग्णालयांमध्ये असे अत्याधुनिक दक्षता कक्ष सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (एफओजीएसआय) ही देशभरातील प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोगतज्ज्ञांची संघटना असून, या संघटनेच्या अध्यक्ष डॉ. हेमा दिवेकर, उपाध्यक्ष डॉ. अल्पेश गांधी यांनी एचडीयू या संकल्पनेचा प्रकल्प अहवाल तयार केला असून महाराष्ट्रासह गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, मध्य प्रदेश व आसाममधील आघाडीच्या १२ वैद्यकीय विद्यापीठांना पाठवला आहे. त्यांच्याकडूनही त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. लवकरच यासंदर्भात पुण्यात प्रसूतीरोग तज्ज्ञांची विशेष कार्यशाळा घेण्यात येणार आहे. गरोदर महिलांसाठीच्या या वैद्यकीय उपचारांची माहितीही यात दिली जाणार आहे. यासाठीचा विशेष अभ्यासक्रमही तयार करण्यात आला आहे. यासंदर्भात अधिक माहितीसाठी ९८४५८१९१९१ वा ९९००१५४४४८ या क्रमांकांवर संपर्क साधावा. www.fogsi.org या संकेतस्थळावरही याची माहिती उपलब्ध आहे.

| Name of Media: | Dainik Kranti Sinh | Language: | Marathi |
|---|---|---|---|
| Date : | 02.08.13 | Page: | 02 |

# एफओजीएसआय तर्फे हाय डिपेन्डन्सी युनिट्स (एचडीयू) उभारण्याचा पुढाकार

उच्च जोखमीचे गरोदरपण (हायरिस्क प्रेग्नन्सी) असलेल्या महिलांना उत्तम तातडीची उपचार सेवा पुरवण्या साठी, तसेच या प्रयत्नांत भारत व दक्षिण आशियाई देशांतील माता मृत्यूदर (मॅटर्नल मॉरटॅलिटी रेट एमएमआर) कमी करण्यासाठी देशातील प्रसूति तज्ज्ञ (ऑब्स्टेट्रिशियन्स) व स्त्रीरोगतज्ज्ञांची (गायनॅकॉलॉजिस्ट्स) शिखर संघटना असलेल्या फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिशियन्स अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडियाने (एफओजीएसआय) प्रवर्तनीय पुढाकार घेतला आहे. त्या अंतर्गत ही संघटना सार्वजनिक, तसेच खासगी आरोग्य क्षेत्रांना हाय डिपेन्डन्सी युनिट्स (एचडीयू) व स्पेशलाइज्ड डेडिकेटेड ऑब्स्टेट्रिक आय.सी.यू या विभागांची स्थापना व जोपासना करण्यात सहकार्य करणार आहे.

भारतात राष्ट्रीय सरासरी माता मृत्यू प्रमाण (एमएमआर) एक लाख जन्मांमागे(लाईव्ह बर्थ) २१२ आहे. याचाच अर्थ एक लाख जन्म संख्येत सरासरी २१२ मातांचा मृत्यू ओढवतो. विकसित देशांत हेच गुणोत्तर एक लाख जन्मांमागे केवळ १० ते ३० आहे. भारतात अगदी रूग्णालयांत होणाऱ्या प्रसूतींची संख्या लक्षात घेतली तरी त्यात हा दर एक लाख आपत्य जन्मांमागे ६० ते ९० इतका, म्हणजेच विकसित देशांच्या तुलनेत लक्षणीय अधिक आहे. याचाच अर्थ भारतात उच्च जोखमीच्या गरोदरपणांत दर्जेदार प्रसूति सुरक्षा पुरवताना, तसेच प्रसूति शास्त्रातील तातडीचे उपचार पुरवताना काही ना काही त्रुटी आहेत. एमएमआर हे केवळ हिमनगाचे टोक असून प्रत्यक्षात ही समस्या व्यापक आहे कारण प्रसूतीदरम्यान एका मातेच्या मृत्यू बरोबरच मरता मरता वाचलेल्या मातांची संख्याही ६० ते ८० असते. अशा जिवंत माता पुढे दीर्घकालीन रोगग्रस्त बनू शकतात.

यावर उपाय म्हणून एफओजीएसआय संघटनेने रूग्णालयांत उच्च जोखमीच्या गरोदरपणावर उपचारासाठी हाय डिपेन्डन्सी युनिट्स(एचडीयू)या खास विभागाची कल्पना प्रवर्तित केली आहे. त्याबाबत माहिती देताना संघटनेच्या अध्यक्ष डॉ.हेमा दिवाकर म्हणाल्या, की सरकारी व खासगी रूग्णालयांत हे एचडीयू विभाग स्थापन झाले तर ज्यांना एरवी तातडीचे उपचार मिळू शकत नाहीत अशा माता व अपत्यांचे प्राण वाचू शकतील. भारतात अशा विभागांबाबत जाणीव कमी आहेच, परंतु त्याचबरोबर या विभागांचे व्यवस्थापन करणाऱ्या आरोग्य व्यवसायिकांची संख्याही पुरेशी नाही. या पार्श्वभूमीवर आमची संघटना एक प्रारंभिक एचडीयू प्रदर्शित करणार आहे आणि एचडीयूचे व्यवस्थापन कसे करावे, हे वैद्यकीय व्यावसायिकांना शिकवणारा व्यावसायिक अभ्यासक्रमही सादर करणार आहे.

एचडीयू म्हणजे एखाद्या रूग्णालयाचा सामान्य रूग्ण विभाग (जनरल वॉर्ड) आणि अतिदक्षता विभाग (आयसीयू) यांच्या दरम्यानचा कक्ष. उच्च जोखमीचे गरोदरपण असलेल्या महिलांची खास काळजी घेणे आणि त्यांच्या प्रकृतीवर इन्व्हेसिव्ह मॉनिटरिंग सुविधेद्वारे बारकाईने देखरेख करणे गरजेचे असते. ही सुविधा सामान्य रूग्णविभागात उपलब्ध नसते.त्याचवेळी अशा रूग्णांना महागड्या अतिदक्षता विभागात दाखल करण्याचीही आवश्यकता नसते. अवयव निकामी झाल्यामुळे रूग्णाची



स्थिती अत्यंत गंभीर झाली असेल तरच त्याला आयसीयूमध्ये हलवणे गरजेचे असते.

एफओजीएसआयचे उपाध्यक्ष डॉ.अल्पेश गांधी म्हणाले, की एचडीयू हा विभाग व्हेंटिलेटर, सोनोग्राफी, सीटीजी मशिन, सीव्हीपी मॉनिटर असलेला कार्डिॲक मॉनिटर, इनक्युबेशन किट, इमर्जन्सी कार्ट, वॉल माउंटेड ऑक्सिजन यंत्रणा व अन्य सुविधांनी सुसज्ज असेल. सामान्य रूग्ण विभाग अथवा अतिदक्षता विभाग यांच्याकडून एचडीयूची मांडणी संपूर्णपणे वेगळी असेल. एचडीयूचे व्यवस्थापन त्याच उद्देशाने खास प्रशिक्षित केलेले वैद्यकीय व्यावसायिक करतील. विकसित देशांमध्ये ही सामान्य प्रथा असल्याने तेथे अगदी रूग्णालयांतील मातमृत्यू दर खाली आणण्यात यश मिळाले आहे.

भारतात गरोदरपणाशी संबंधित मृतयू मुख्यत: दोन कारणांनी ओढवतात. १) योग्य त्या आरोग्य सुरक्षेचा अभाव (रूग्णालयीन उपचार न मिळणे) आणि २) गरोदरपणाशी संबंधित अन्य समस्या उदाहरणार्थ –अतिरक्तदाब (हायपरटेन्शन), गर्भिणी विषबाधा (इक्लाम्प्सिया), रक्तस्त्राव (हिमोरेज), पूधरणे (सेप्सिस), मधुमेह (डायबेटिस), कावीळ (जाँडीस) यासारखी गुंतागुंतीची लक्षणे किंवा रूग्णालयात नेण्यास विलंब होणे, वाहतूक सुविधांचा अभाव वगैरे. या दोन्ही कारणांमुळे गरोदरपणात जोखीम वाढते व त्यासाठी तेवढीच तातडीची सुरक्षा पुरवावी लागते.

डॉ.गांधी पुढे म्हणाले, की भारतीय रूग्णालयांत सामान्य रूग्ण विभागांत महिलांना उच्च जोखमीचे गरोदरपण असो, अथवा नसो, समान उपचार दिले जातात. युनायटेड किंग्डमसारख्या (युके) देशात मात्र अशी स्थिती नसते. तेथे ३० टक्के रूग्णाल यांत एचडीयू विभाग असतो. उच्च जोखमीचे गरोदरपण असलेल्या महिलांवर अतिदक्षता विभागात उपचार केल्यास त्यातून माता व अपत्याला प्रादुर्भाव (इन्फेक्शन) होण्याचा धोका असतो कारण आयसीयू मध्ये अन्य वैद्यकीय समस्यांचे रूग्णही दाखल असतात. काही वेळा आयसीयूमध्ये दाखल केलेल्या मातांपासून अपत्यांना वेगळे करावे लागते आणि त्यातूनही पुढे मानसिक समस्या निर्माण होऊ शकतात.

एचडीयूचे व्यवस्थापन हे प्रशिक्षित तज्ज्ञाचे कार्यक्षेत्र असते. आजघडीला एचडीयू व स्पेशलाइज्ड ऑब्स्टेट्रिक आयसीयूचे व्यवस्थापन प्रशिक्षण कोणत्याही वैद्यकीय विद्यापीठाद्वारे दिले जात नाही. म्हणूनच उच्च जोखमीचे गरोदरपण व तातडीचे उपचार या विषयातील प्रशिक्षित प्रसूतिशास्त्र तज्ज्ञ घडवण्यासाठी शैक्षणिक परिसंस्था निर्माण करण्याच्या हेतूने एफओजीएसआय ही संघटना आघाडीच्या वैद्यकीय विद्यापीठांच्या सह कार्याने क्रिटिकल केअर इन ऑब्स्टेट्रिक्स विषयातील पदव्युत्तर पाठयवृत्ती अभ्यासक्रम सुरू करणार आहे.

यासंदर्भात डॉ.दिवाकर म्हणाल्या, की आम्ही महाराष्ट्र, गुजरात, तमीळनाडू, कर्नाटक, वारणासी, मध्य प्रदेश व आसाममधील आघाडीच्या १२ वैद्यकीय विद्यापीठांच्या कुल गुरूंना हा पाठ्यवृत्ती अभ्यास क्रम सादर करण्याबाबतच्या तज्ज्ञ गटाच्या बैठकीसाठी पुण्यात आमंत्रित केले आहे. आमचे एचडीयू प्रारूप भारतात यशस्वी ठरेल, याबाबत आम्ही अत्यंत आशावादी आहोत. भारताप्रमाणेच या समस्यांचा मुकाबला कराव्या लागणाऱ्या दक्षिण आशियाई देशांमध्येही हे प्रारूप एकाचवेळी सादर केले जाईल. एफओजीएसआयतर्फे एचडीयू पुढाकार जाहीर होताना एक औचित्यपूर्ण योगायोगही जुळून आला आहे.

डॉ.गांधी म्हणाले, की आम्हाला इक्लाम्प्सिया, एचईएलएलपी सिंड्रोम, सिव्हिअर हिमोरेज, सिव्हिअर सेप्सिस, सेरेब्रल व्हेनेस थाब्रॉसिस (सीव्हीटी), ॲक्युट रीनल फेल्युअर विथ प्रेग्नन्सी आदी प्रसूति शास्त्रातील गुंतागुंतीच्या व रूग्णाच्या जीवाला धोका असलेल्या समस्यांचा नेहमी सामना करावा लागतो. या स्थितीत तातडीचे उपचार गरजेचे असतात. प्रसूतिशास्त्रीय सुरक्षा वेळेत पुरवली गेली तर अशा गंभीर आजारी गरोदर महिलांपैकी ८० टक्के रूग्णांचे प्राण आम्ही नक्कीच वाचवू शकू. गंभीर अवस्थेतील गरोदरपणातून महिलांची सुटका करण्यासाठी वैद्यकीय उपचार, २४ तास देखरेख, इन्व्हेसिव्ह व इन्टेन्सिव्ह केअर सुविधा, कौशल्याधारित सेवा व बहुशाखीय सामूहिक कार्य या गोष्टींची आवश्यकता आहे.

**एफओजीएसआय विषयी-** फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिक सोसायटीज ऑफ इंडिया (एफओजीएस आय) ही व्यावसायिक संघटना असून ती भारतातील प्रसूतिशास्त्र व स्त्रीरोग विज्ञान क्षेत्रातील डॉक्टरांचे प्रतिनिधीत्व करते. या क्षेत्रांतील २१९ सोसायटया व २७००० हून अधिक व्यक्ती या संघनेच्या सदस्य आहेत. विशेष व्यावसायिकांची सर्वाधिक सदस्य नोंदणी असणाऱ्या संघटनांपैकी ती आहे. तिची स्थापना मद्रास मध्ये ६ जानेवारी १९५० मध्ये सहाव्या ऑल इंडिया काँग्रेस ऑफ ऑब्स्टेट्रिक्स अँड गायनॅकॉलॉजी परिषदेत झाली. त्यावेळी अहमदाबाद, बंगाल, बॉम्बे, मद्रास व पंजाबच्या ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटयांनी पुढाकार घेऊन अशी शिखर संघटना स्थापण्याचा प्रस्ताव मांडला आणि एफओजी एसआयला मूर्त रूप प्राप्त झाले. तपशिलासाठी संकेतस्थळ www.fogsi.org.

`

| Name of Media: | Lok Awaaj | Language: | Marathi |
|---|---|---|---|
| Date : | 11.08.13 | Page: | 05 |

# गरोदर मातांसाठी सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभागाचे नियोजन:डॉ.दिवेकर

अहमदनगर,(प्रतिनिधी): गरोदर मातांच्या सुरक्षिततेसाठी स्त्रीरोग तज्ज्ञ व प्रसूतिरोग तज्ज्ञांची शिखर संघटना असलेल्या एफओजीएसआय संघटनेने पुढाकार घेतला असून देशभरातील सर्व सार्वजनिक रुग्णालयात गरोदर मातांच्या सुरक्षिततेसाठी अतिदक्षता विभागाची स्थापना करण्याचे नियोजन असल्याची माहिती संघटनेच्या अध्यक्षा डॉ. हेमा दिवेकर यांनी दिली. डॉ. दिवेकर, उपाध्यक्ष डॉ.अल-पेश गांधी यांनी एचडीयु या संकल्पनेचा अहवाल तयार केला असून तो महाराष्ट्रासह गुजराथ, तामिळनाडू, कर्नाटक, मध्यप्रदेश व आसाममधील आघाडीच्या १२ वैद्यकीय विद्यापीठांना पाठवला आहे. त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसादही मिळाला आहे. लवकरच पुण्यात या संदर्भात प्रसूतीरोग तज्ज्ञांच्या विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. गरोदर महिलांच्या वैद्यकीय उपचारांची माहिती या कार्यशाळेत देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील गरोदर महिलांवर बहुतांश उपचार सरकारी दवाखान्यातच होत असल्याने अशा रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक दक्षता कक्ष सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येणार असल्याचे डॉ.दिवेकर यांनी सांगितले.

| Name of Media: | Nava Marata | Language: | Marathi |
|---|---|---|---|
| Date : | 10.08.13 | Page: | 07 |

# शासकीय व सार्वजनिक रुग्णालयात अतिदक्षता विभाग सुरू होणार

## गरोदर मातांच्या सुरक्षेसाठी स्त्रीरोग तज्ज्ञांचा पुढाकार

नगर-गरोदरपणा अतिरक्तदाब, विषबाधा, रक्तस्त्राव, पू होणे, मधुमेह व काविळीसारख्या आजाराने मातांचे व बाळांचे होणारे मृत्यु रोखण्यासाठी स्त्री रोग तज्ज्ञ व प्रसुतीरोग तज्ज्ञांची शिखर संघटना असलेल्या फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (एफओजीएसआय) या संघटनेने पुढाकार घेतला आहे. देशभरातील शासकीय व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग सुरू होणार आहेत, अशी माहिती डॉ. हेमा दिवेकर यांनी दिली.

शहरी भागात वैद्यकीय सेवा दर्जेदार मिळतात, त्यामुळे गरोदरपणात माता व बाळाच्या मृत्यूचे प्रमाण कमी आहे, पण ग्रामीण भागात महिलांनी गरोदरपणात स्वतःची विशेष काळजी घेतली नाही वा कुटुंबियांनीही त्याकडे दुर्लक्ष केले तर माता व बाळाच्या मृत्यूच्या घटना घडण्याचे प्रमाण जास्त असते. ही स्थिती दूर व्हावी तसेच माता व बाळांचे जीवन सुरक्षित असावे यासाठी हाय डिपेंडन्सी युनिट (एचडीयु) व स्पेशलाईज्ड डेडीकेटेड ऑब्स्टेट्रीक आयसीयू विभाग सरकारी व सार्वजनिक रुग्णालयांसह खासगी रुग्णालयांमध्येही सुरू करण्याचे नियोजन आहे. याअंतर्गत रुग्णालयाचा सामान्य रुग्णविभाग (जनरल वॉर्ड) व अतिदक्षता विभाग (आयसीयू) यादरम्यान विशेष कक्ष सुरू करून जोखमीचे गरोदरपण असलेल्या महिलांची विशेष काळजी या कक्षाद्वारे घेतली जाणार आहे. या महिलांच्या प्रकृतीची इन्व्हेसिव्ह मॉनिटरिंग सुविधेद्वारे बारकाईने देखरेख करून त्यांच्यावर आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत.



डॉ. हेमा दिवेकर

एचडीयु विभागाची रचना अतिदक्षता विभाग वा सामान्य रुग्ण विभागापेक्षा वेगळी असणार आहे. यात व्हेंटिलेटर, सोनोग्राफी, सीटीजी मशीन, सीव्हीपी मॉनिटर असलेला कार्डिॲक मॉनिटर, इनक्युबेशन किट, इमर्जन्सी कीट, वॉल माऊंटेड ऑक्सिजन यंत्रणा व अन्य सुविधा असणार आहेत. ग्रामीण भागातील गरोदर महिलांवर बहुतांश वैद्यकीय उपचार सरकारी रुग्णालयांतूनच होत असल्याने अशा रुग्णालयांमध्ये असे अत्याधुनिक दक्षता कक्ष सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (एफओजीएसआय) ही देशभरातील प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोगतज्ज्ञांची संघटना असून, या संघटनेच्या अध्यक्ष डॉ. हेमा दिवेकर, उपाध्यक्ष डॉ. अल्पेश गांधी यांनी एचडीयू या संकल्पनेचा प्रकल्प अहवाल तयार केला असून महाराष्ट्रासह गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, मध्य प्रदेश व आसाममधील आघाडीच्या १२ वैद्यकीय विद्यापीठांना पाठवला आहे. त्यांच्याकडूनही त्यास सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. लवकरच यासंदर्भात पुण्यात प्रसूतीरोग तज्ज्ञांची विशेष कार्यशाळा घेण्यात येणार आहे. गरोदर महिलांसाठीच्या या वैद्यकीय उपचारांची माहितीही यात दिली जाणार आहे. यासाठीचा विशेष अभ्यासक्रमही तयार करण्यात आला आहे. माहितीसाठी ९८४५८१९१९१ वा ९९००१५४४४८ या क्रमांकावर संपर्क साधावा. www.fogsi.org या संकेतस्थळावरही याची माहिती उपलब्ध आहे.

| Name of Media: | Sarvmath | Language: | Marathi |
|---|---|---|---|
| Date : | 10.08.13 | Page: | 05 |

# गरोदर मातांच्या सुरक्षेसाठी स्त्रीरोग तज्ज्ञांचा पुढाकार

**अहमदनगर (प्रतिनिधी)** - गरोदरपणात अतिरक्तदाब, विषबाधा, रक्तस्त्राव, पू होणे, मधुमेह व कविळीसारख्या आजाराने माता व बाळांचे होणारे मृत्यू रोखण्यासाठी फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रीक ॲण्ड गायनॅकोलॉजिकल सोसायटीज ऑफ इंडिया या स्त्री रोग तज्ञांच्या देशातील शिखर संघटनेने पुढाकार घेतला आहे. संघटनेच्या माध्यमातून देशभरातील शासकीय व सार्वजनिक रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग सुरु करण्यात येणार असून त्यामुळे माता मृत्यूदर कमी होण्यास मदत होईल, अशी माहिती संघटनेच्या अध्यक्षा डॉ. हेमा दिवेकर यांनी दिली.



डॉ. दिवेकर व उपाध्यक्ष डॉ. अल्पेश गांधी यांनी एचडीयू या संकल्पनेचा हा प्रकल्प अहवाल तयार केला आहे. हा अहवाल महाराष्ट्रासह गुजरात, तामिळनाडू, कर्नाटक, मध्यप्रदेश व आसाममधील प्रमुख १२ विद्यापीठांना पाठविण्यात आला असून त्यांनीही यास सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. या प्रकल्पासाठी लवकरच पुणे येथे स्त्री रोग तज्ञांची कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून प्रकल्पाबबात व गरोदर मातांच्या उपचाराबत यामध्ये माहिती देण्यात येणार असल्याचे डॉ. हेमा दिवेकर यांनी सांगितले.